# द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.

पत्ता :- ८१९-अ,भवानी पेठ,पुणे:-४११ ०४२

नोंदणी क्र.:- बी-३०५६,दिनांक:-१४-११-१९६०.

---

दिनांक:-२०/०२/२०२२

## पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

द सरस्वती सहकारी गृहरचना संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १४.०२.२०२२ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता संस्थेच्या आवारामध्ये आयोजित करण्यात आली होती. संस्थेचे प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी आणि श्री.विजय ओसवाल हे उपस्थित होते. अध्यक्षांनी उपस्थित सभासदांचे स्वागत करून सभेला सुरुवात करण्यात आली.

विषय क्रमांक ०१ :- संस्थेच्या पुर्नबांधणी प्रकल्पाबाबत प्राथमिक निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक ०१ :- संस्थेच्या अध्यक्षांनी आजच्या सभेसाठी पुर्नविकसनाबाबत सभासदांना मार्गदर्शन करण्यास आमंत्रित केलेले श्री.संजय सुर्यवंशी **सहकार मार्गदर्शक** यांची सभासदांना ओळख करून दिली. व त्यांना पुर्नविकसना बाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

श्री.विजय ओसवाल यांनी प्रथम सभासदांना सहकार खात्याच्या ४ जुलै २०१९ च्या परिपत्रकाबाबत विस्तृत माहिती दिली. सदर प्रक्रिया पार पाडत असताना प्रत्येक टप्प्याबाबत विस्तृत विवेचन त्यांनी सभेपुढे केले.त्यावर सभासदांनी वेगवेगळया शंका विचारल्या एकूण सर्व चर्चा सकारात्मक पध्दतीने झाली तसेच सभासदांकडून मांडण्यात आलेल्या शंकांना योग्य पध्दतीने सकारात्मक दृष्टिकोनाने शंकासमाधान करण्यात आले. व याचा विचार करताना सभासदांचा पुर्नबांधणी करण्यासाठी कौल असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार उपस्थित सभासदांची पुर्नबांधणी प्रस्तावास प्राथमिक मंजुरी असल्याचे सांगण्यात आले. अशा रितीने पुर्नबांधणी प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात आला.

सुचक:-सौ.रेणु गेहलोत

अनुमोदक:-सौ.बिंदु शर्मा

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०२ :- सदर पुर्नबांधणी प्रस्तावाच्या कार्यवाहीबाबत पुर्नविकास समिती नेमणे व त्यांना अधिकार देणेबाबत.

ठराव क्रमांक ०२ :-संस्था इमारत पुर्नबांधणी प्रस्तवाच्या कार्यवाहीबाबत विवेचन श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभेपुढे केले त्यानुसार सहकार खात्याने आत्ता ४ जुलै २०१९ रोजी संस्था इमारत पुर्नविकास करणेसाठी विशेष परिपत्रक काढण्यात आले. त्यानुसार त्यातील आवश्यक बाबींची पुर्तता करण्यासाठी, सदर बाबत आवश्यक माहिती गोळा करणे, वेगवेगळया एजन्सीची माहिती घेणे, त्यांच्याकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रक तसेच निविदा मागविणे, या सर्व गोष्टीवरील उल्लेख केलेल्या परिपत्रकातील आवश्यक बाबींची पुर्तता करणेकामी कार्यवाही करणेबाबत संस्थेची पुर्नविकास समिती व व्यवस्थापक समितीस अधिकार देण्याबाबत सदर ठरावाद्वारे सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सदर समिती पुढीलप्रमाणे :-

इमारत पुर्नविकास समिती सभासदांची नावे पुढीलप्रमाणे:-

| | |
|---|---|
| १. सौ.मधु शर्मा | अध्यक्ष |
| २. सौ.कांता हरजानी | सचिव |
| ३. श्री.ललित छाब्रिया | खजिनदार |
| ४. सौ.किशिन मिरानी | पुर्नविकास समिती सदस्य |
| ५. सौ.सविता शर्मा | पुर्नविकास समिती सदस्य |
| ३. सौ.मिना क्रिपलानी | पुर्नविकास समिती सदस्य |

सुचक :-श्री. जय शर्मा                    अनुमोदक :-श्री. रमेश गोधवानी

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०३ :- सदर प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी प्रकल्प सल्लागार व निर्णय घेणेबाबत.

ठराव क्रमांक ०३ :- सदर विषयाबाबत सहकार खात्याच्या परिपत्रकानुसार आवश्यकतेनुसार वगवेगळया एजन्सीज् नेमणे, आर्किटेक्ट व वकिल प्रोफेशनल सल्ला घेणे, आवश्यक ती कागदपत्रे तयार करून घेणे, आवश्यक त्या पध्दतीचा अवलंब करणे यासाठी लागणारे सर्व मार्गदर्शन त्या त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून घेणे आवश्यक आहे. त्याचे महत्व तसेच त्याबाबतच्या आर्थिक बाबी या सर्व गोष्टी मा.पदाधिकाऱ्यांकडून सभासदांपुढे मांडण्यात आल्या सभासदांकडून याबाबत वेगवेगळी

माहिती विचारण्यात आली. तसेच काही शंका उपस्थित करण्यात आल्या. परंतु त्या सर्व शंकांचे योग्य पध्दतीने व आवश्यक माहिती पुरवून समाधान करण्यात आले. त्यानुसार प्रकल्प सल्लागार म्हणुन मेसर्स.सोसायटी प्लस यांची नेमणुक करणेबाबत सर्व सभासदांचे एकमत झाले व त्यानुसार त्यांना नेमणुकीचे पत्र देण्यात यावे असे ठरविण्यात आले.

सुचक:-सौ.रिया मिरवानी अनुमोदक:- श्री.राहुल सावलानी

ठराव सर्वसंमत

विषय क्रमांक ०४ :- संस्थेच्या इमारत पुर्नविकासासंबंधीच्या कार्यक्रमाची रूपरेषा सादर करणे.

ठराव क्रमांक ०४ :- श्री.संजय सुर्यवंशी यांनी सभेपुढे इमारत पुर्नविकासासंबंधिच्या कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. त्यामध्ये पहिल्या दोन टप्प्यांच्या 1.Feasibility Report कार्यवाहीच्या स्वरूपाबाबत माहिती दिली व त्याबाबतच्या कार्यवाहीचे अधिकार पुनर्विकास समिती व प्रकल्प सल्लागार यांना देण्यात आले. सदर प्रोसेसची कार्यवाही पुर्ण करून साधारण दोन ते तीन महिन्यांत विशेष सर्वसाधारण सभा घेऊन कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येईल.

सुचक :-श्री. जय शर्मा अनुमोदक :-श्री. रमेश गोधवानी

ठराव सर्वसंमत

यानंतर पुनर्विकास समितीच्या वतीने उपस्थित राहिलेल्या सर्व सभासदांचे, प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी आणि श्री.विजय ओसवाल यांचे संस्थेच्या वतीने आभार मानले आणि आजची सभा संपल्याचे जाहीर केले.

The Saraswati Co-op. Housing Society Ltd. Poona. Regd. No. B-3056 14-11-1960

**द सरस्वती सहकारी गृहरचना संस्था मर्यादित**

Madhu L Sharma

**अध्यक्ष** **सचिव** **खजिनदार**